# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी परिषद निवडणुकांसंदर्भात संवाद सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन

## जाहीर आवाहन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या तरतुदींनुसार विद्यार्थी परिषद निवडणुकांसंदर्भात महाराष्ट्र शासनाने विद्यार्थी परिषद निवडणुकांसंदर्भातील अभ्यास व सल्लामसलत करण्यासाठी तज्ज्ञ समिती घटित करण्यात आली असून या समितीद्वारा सर्व सार्वजनिक विद्यापीठांमधील विद्यार्थी व विविध घटकांशी संवाद साधण्यात येत आहे. ह्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विद्यार्थी याशिवाय विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थी संघटना, प्राचार्य संघटना, शिक्षक संघटना आणि इतर सर्व घटकांशी संवाद शनिवार दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. हा संवाद साधण्यासाठी समिती सदस्य म्हणून माजी प्र–कुलगुरू मा. डॉ. एन एस उमराणी, मा. प्रा. डॉ.प्रभाकर देसाई, मा. प्राचार्य डॉ. संजय खरात, मा. प्रा. डॉ. डी. बी. पवार हे समिती सदस्य उपस्थित राहणार आहेत.

यास्तव विद्यार्थी परिषद निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील वरील सर्व घटकांचे अभिप्राय, सूचना व मते जाणून घेण्याकरिता शनिवार, दिनांक १७ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता भू–शास्त्र विभाग सभागृह, (आरोग्य केंद्रासमोर) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथे संवाद सभेचे आयोजन केले आहे.

त्यामुळे विद्यार्थी परिषद निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील संवाद सभेस **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित व स्वायत्त महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागातील विद्यार्थी, विविध विद्यार्थी संघटना, प्राचार्य संघटना, शिक्षक संघटना यांचे पदाधिकारी/सदस्य आणि संबंधित इतर सर्व घटकांना शनिवार, दिनांक १७ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता भू–शास्त्र विभाग सभागृह, (आरोग्य केंद्रासमोर) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथे उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.**

**विद्यार्थी विकास मंडळ**
गणेशखिंड, पुणे – ७
संदर्भ क्र. : २०२६–२७/४००
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२६

**(डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक (अतिरिक्त कार्यभार), विद्यार्थी विकास मंडळ

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता**

मा. अधिष्ठाता व सर्व संविधानिक अधिकारी :– यांना विनंती की, कृपया आपण संवाद सभेस उपस्थित रहावे.

मा. विभागप्रमुख/मा. शाखाप्रमुख/मा. संचालक
सर्व शैक्षणिक विभाग, विद्यापीठ परिसर

मा. प्राचार्य/संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित व स्वायत्त सर्व महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था.

} आपणांस विनंती करण्यात येते की, सदर बाब संबंधित सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन उपस्थित राहण्याबाबत संबंधितांना सूचित करावे व आपणही संवाद सभेस उपस्थित रहावे.

मा. अध्यक्ष/सचिव
मा. प्राचार्य/शिक्षक/शिक्षकेत्तर सेवक संघटना

मा. अध्यक्ष/सचिव
सर्व विद्यार्थी संघटना

} आपणांस विनंती करण्यात येते की, आपण आपल्या संघटनेच्यावतीने प्रातिनिधिक स्वरूपात उपस्थित रहावे.